## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री व छत्रपती शिवाजी महाराज मेमोरिअल राष्ट्रीय समिती नवी दिल्लीचे सचिव श्री.विजय नवल पाटील यांनी पुढाकार घेतला असून समितीच्या वतीने दुसऱ्या टप्प्यातील एक लाख रुपयांचा धनादेश प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. दरम्यान आज या शिष्यवृत्ती संदर्भातील नियमावलीचे प्रारुप निश्चित करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज मेमोरिअल राष्ट्रीय समिती नवी दिल्लीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा गतवर्षी निर्णय घेण्यात आला होता. श्री.विजय नवल पाटील यांनी गतवर्षी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला होता. आज मंगळवारी समितीचे सदस्य सचिव ॲड.बी.के. शिंदे व प्रा. सुनील गरुड यांनी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्याकडे उर्वरित एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य एल.पी.देशमुख उपस्थित होते.

दरम्यान प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी या शिष्यवृत्तीची नियमावलीचे प्रारुप निश्चित करण्यासाठी बैठक झाली. या बैठकीस ॲड.बी.के.शिंदे, पी.ई.तात्या पाटील, प्रा.सुनील गरुड, प्रा.पी.डी.जगताप, डॉ.सर्जेराव भामरे,डॉ.सुनील पाटील उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर विद्यापीठांतर्गत पीएच.डी करणाऱ्या दोन संशोधक विद्यार्थ्यांना दोन वर्षासाठी दरमहा आठ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. संशोधक विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठीची निवड जाहिरात देवून व विद्यापीठ नियमाप्रमाणे केली जाईल आदी नियमावलीच्या मसुद्यावर यावेळी चर्चा करण्यात आली. या बैठकीत छत्रपती शिवाजी अध्यासन व संशोधन केंद्राला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने पी.ई.तात्या पाटील यांनी काही सूचना केल्या.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत मंगळवार, दि.८ जानेवारी रोजी `ओपन डे ` चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रशाळेतील परिक्षार्थी विद्यार्थ्यांना त्यांच्या तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका थेट हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अभिनव कल्पनेतून गेल्या दोन वर्षापासून थेट उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करणारा `ओपन डे `हा प्रयोग विविध प्रशाळांमध्ये राबविण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. या परीक्षांमध्ये तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी `ओपन डे `चे आयोजन करण्यात आले होते. या `ओपन डे` च्या दिवशी प्रत्यक्ष कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरु म्हणाले की, प्रत्यक्ष उत्तरपत्रिका हातात पडल्यानंतर परीक्षकांशी मिळालेल्या गुणांबाबत विद्यार्थ्यांना संवाद साधता येत असल्यामुळे आपल्या नेमक्या चुका कुठे झाल्या आहेत याची जाणीव हाऊन झालेल्या चुकांमधून विद्यार्थ्यांना बोध घेता येतो व पुढील परीक्षांसाठी चांगली तयारी करता येते. या `ओपन डे` मध्ये प्रथम वर्षाच्या ५२ व द्वितीय वर्षाच्या ४६ अशा एकूण ९८ विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिकांचे अवलोकन केले.यावेळी परीक्षा समितीचे समन्वयक प्रा.समीर नारखेडे, प्रा.अनिल डोंगरे, डॉ.आर.आर.चव्हाण, डॉ.रमेश सरदार, डॉ.अतुल बारेकर, डॉ.पवित्रा पाटील, प्रा.डी.के.खेरवाणी, प्रा.चेतन कुलकर्णी उपस्थित होते.

..२..

**बातमी क्र.३**

जळगाव दि.०८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने सप्टेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आलेली पीएच.डी पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच जुलै, २०१८ मध्ये कोर्सवर्क केलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्री-पीएच.डी. कोर्सवर्क ऑनलाईन परीक्षेसाठी अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली आहे. प्री-पीएच.डी. कोर्सवर्क ऑनलाईन परीक्षा दि. १९ ते २१ जानेवारी, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

या प्री-पीएच.डी कोर्सवर्क ऑनलाईन परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्क (पेमेंट गेटवेद्वारे) भरण्यासाठी ७ जानेवारी पासून लॉग इन वर लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पीएच.डी प्रोसेस् w w w. oaasisnmu.org या लिंक वर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉग इन आयडी मधून आवश्यक ते शुल्क ऑनलाईन पेमेंट ऑफ फीस या टॅबमधून भरणा केल्यानंतर विद्यार्थ्यास हॉल तिकीट उपलब्ध होणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे पेट २०१७ च्या व्यतिरिक्त २०१२, २०१४ या वर्षासाठी पेट परीक्षेचे प्री-पीएच.डी कोर्सवर्क ऑनलाईन परीक्षा देणे बाकी आहे, अशा विद्यार्थ्यांनी संशोधन विभागाशी संपर्क साधून पुढील प्रक्रीया पूर्ण करावी. तसेच यासाठी वेळावेळी विद्यापीठाचे संकेतस्थळ पहावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असून सदर अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदर परीक्षेचा विषय दिनांकनिहाय कार्यक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.यासंदर्भात अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संशोधन विभागाशी अंतर्गत दुरध्वनी क्र. ०२५७-२२५७२२४ व २२५७२८४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक:- ८ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी